
BPEd
2022-2024
batch


Volleyball Arena

महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे.

वार्षिक अहवाल २०२३-२४

शारीरिक शिक्षणाचे खंदे पुरस्कर्ते, महाराष्ट्रीय मंडळाचे संस्थापक कै.कॅ.शिवरामपंत दामले, मंडळाचे द्रष्टे माजी सरकार्यवाह, कै. रमेश दामले सर आणि आमचे प्रेरणास्थान कै. धनंजय दामले यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे.

यंदा महाविद्यालयाने ४७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित बीपीएड्., एमपीएड्, व पीएच.डी. (शारीरिक शिक्षण) हे अभ्यासक्रम राबविले जातात. महाविद्यालयास एन.सी.टी.ई.ची मान्यता प्राप्त असून ते नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

• ठळक वैशिष्ट्ये/विशेष कामगिरी

१) फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम - दि. २९ व ३० ऑगस्ट २०२३.

२) प्रेरणादिनानिमित्त संस्थेच्या शाळा व महाविद्यालयामध्ये 'मी शिवाकाका' कार्यक्रम (दि.०६ सप्टेंबर २०२३)

३) बीपीएड/एमपीएड प्रवेश २०२२-२३ सीईटी मैदान परीक्षेचे महाविद्यालयात यशस्वी आयोजन (दि.३-४ ऑगस्ट २०२३)

४) क्रीडादिन संपन्न (दि.०८/०९/२०२३)

५) सत्रारंभ तृतीय सत्र बीपीएड दि.०५/०९/२०२३ व एमपीएड दि.०४/०९/२०२३.

६) एम.पी.एड विद्यर्थी सायकल ट्रिपचे आयोजन दिनांक ०९ व १० सप्टेंबर २०२३ ला आयोजित करण्यात आले.

७) महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा. (०५ सप्टेंबर २०२३)

८) विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी उत्सव साजरा. (०७/०९/२०२३)

९) विद्यार्थ्यांसाठी गणपती बनविण्याची कार्यशाळा. (०९/०९/२०२३)

१०) विद्यार्थ्यांनी अनाथ व दिव्यांग मुलांसोबत दिवाळी साजरी. (०८/११/२०२३)

११) बी.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फिटनेस क्षेत्रात नोकरीची संधी या संदर्भात व्याख्यान.(०९/१२/२०२३)

१२) बी.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांद्वारे खेळ आणि फिटनेस प्रदर्शन आयोजन. (१६/१२/२०२३)

१३) एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी रग्गबी खेळाची कार्यशाळा.(२०/१२/२०२३)

१४) बी.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिबिर आयोजित. (२१/१२/२०२३ ते २३/१२/२०२३)

१५) बी.पी.एड व एम.पी.एड प्रथम, द्वितीय वर्ष विद्यापीठ परीक्षा ०५/०१/२०२४ ते २०/०१/२०२४ दरम्यान आयोजित.

१६) महाविद्यालयातील बी.पी.एड द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांचा इंटर्नशिप कार्यक्रम सुमारे ८२ शाळांमध्ये १० जानेवारी २०२४ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत.

१७) विद्यापीठ परीक्षांसंदर्भातील कार्यासाठी नवीन झेरॉक्स मशीन आणले. (१३/०१/२०२४)

१८) बी.पी.एड द्वितीय सत्र व एम.पी.एड चतुर्थ सत्र २३ जानेवारी २०२४ रोजी सुरू करण्यात आले.

१९) एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी स्केटिंग खेळाची कार्यशाळा. (०७ फेब्रुवारी २०२४)

२०) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ (मुली) खो खो स्पर्धेचे दि. १५/०२/२०२४ ते १९/०२/२०२४ दरम्यान आयोजन.

२१) एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सॉफ्टबॉल खेळाची कार्यशाळा.(०१/०३/२०२४)

२२) महाविद्यालयाने दि.१६ व १७ फेब्रुवारी २०२४ रोजी मॅट टू मांईड या आंतरराष्ट्रीय योग परिषदेचे आयोजन.

२३) एम.पी.एड प्रवेश २०२४-२५ मैदान चाचणी परीक्षा दि.०४/०३/२०२४ रोजी घेण्यात आली. या चाचणीस ४१८ विद्यार्थी उपस्थित होते.

२४) बी.पी.एड प्रवेश २०२४-२५ मैदान चाचणी परीक्षा दि.०८ व ०९ मार्च २०२४ रोजी घेण्यात आली. या चाचणीस ८११ विद्यार्थी उपस्थित होते.

२५) महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.शिरिष मोरे यांची करियर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत सहाय्यक प्राध्यापक पदावरून सहयोगी प्राध्याप पदी बढती. (दि. ११ मार्च २०२४)

२६) दि. ११/०३/२०२४ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी जेरियाटिक फिटनेस सत्राचे आयोजन.

२७) दि. १३/०३/२०२४ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी झुंबा सत्राचे आयोजन.

२८) एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी लॉन टेनिस खेळाची कार्यशाळा.(१६/०३/२०२४)

२९) महाविद्यालयामध्ये 'कमवा शिका' योजना राबविण्यात आली. (या योजनेमध्ये १३ विद्यार्थी व ९ विद्यार्थिनी अशा एकूण २२ विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवीला. योजना राबविण्याचा प्रत्यक्ष खर्च रु.७०,४२५/- महाविद्यालयाने केला. या योजनेकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून रक्कम रु.६३,३८३/- इतका निधी देण्यात आला.) (१५/०३/२०२४)

३०) महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी (रु.१,००,०००/- मंजूर करण्यात आले. (१५/०३/२०२४))

३१) २१ मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयात आगाशे क्रीडा संग्राम २०२४ चे आयोजन. (या क्रिडा संग्रामामध्ये बी.पी.एड प्रथम वर्ष, बी.पी.एड द्वितीय वर्ष व एम.पी.एड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.)

गतवर्षीय परीक्षा फल :

सालाबाद प्रमाणे निकालामध्ये उत्तम यश

अभ्यासक्रम	निकाल
बीपीएड् (मे २०२३)	९०.०९%
एमपीएड्.(मे २०२३)	९०.४७ %

अभ्यासक्रम	२०२३-२४ मधील उत्तीर्ण	२०२२-२३ पर्यंत उत्तीर्ण
एम.फिल (शा.शि.)	०	१००
पीएच.डी.	०	४५७

- **नेट व सेट परीक्षा जानेवारी २०२४** - शीतल करपे, झिनल झाला, विल्मा फलेरीओ, अजित खंकाळ, अक्षय यादव, अक्षय चित्ते, गौरव जाधव, बाबजी साळुंखे, अविनाश देशमुख, सिद्धांत टाक, नीला कांबळे, पृथ्वीराज सरनाईक, वेदांती प्रेमचंदानी, गुडलक राय, प्रणव सुपनेकर, विराज अगावकर, मनोज पवार इत्यादी विद्यार्थी नेट व सेट परीक्षेमध्ये पात्र झाले.

महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम (परीक्षा मे २०२३)

बीपीएड - श्रीमती वैष्णवी शिवाजी बरके

एमपीएड - श्री ओंकार बालाजी जाधव

पीएच.डी.–

१) श्री नितीन वाळूंज (मार्गदर्शक– डॉ.श्रद्धा नाईक)
२) श्री कुमार उपाध्याय (मार्गदर्शक–डॉ.बालाजी पोटे)
३) श्री मनोज देवळेकर (मार्गदर्शक–डॉ. महेश देशपांडे)
४) सौ.एकता जाधव (मार्गदर्शक–डॉ. महेश देशपांडे)

प्रवेश

- **बीपीएड् –** या वर्षावधीत महाराष्ट्र शासनाच्या सीईटीद्वारे १०० विद्यार्थ्यांनी बीपीएड्. अभ्यासक्रमासाठी (प्रथमवर्ष) प्रवेश घेतला आहे. त्यापैकी १५ विद्यार्थी राज्याबाहेरील आहेत. बी.पी.एड्. अभ्यासक्रमासाठी (द्वितीयवर्ष) १०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यापैकी १७ विद्यार्थी राज्याबाहेरील आहेत. बीपीएड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत.

- **एमपीएड.** (प्रथमवर्ष) यावर्षी सीईटी द्वारे एमपीएड अभ्यासक्रमास ३१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला त्यापैकी ०८ विद्यार्थी राज्याबाहेरील आहेत तर द्वितीयवर्षा मध्ये ३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी ०४ विद्यार्थी राज्याबाहेरील आहेत.

- **शैक्षणिक सत्रारंभ –**

  बीपीएड –प्रथमसत्र दि.०५ सप्टेंबर २०२३

  एमपीएड – प्रथमसत्र दि.०४ सप्टेंबर २०२३

- **स्पर्धा सामने आयोजन**

१) सा.फु.पुणे विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा – बास्केटबॉल (मुली) –दि.१२ ऑक्टो.२०२३
२) सा.फु.पुणे विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा – बास्केटबॉल (मुले) –दि.११ ऑक्टो.२०२३
३) पुणे शहर आंतर विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा – व्हॉलीबॉल (मुले) –दि.१६ ऑक्टो.२०२३
४) पुणे शहर विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा – व्हॉलीबॉल (मुली) –दि.१८ ऑक्टो.२०२३
५) पुणे शहर विभागीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा – बास्केटबॉल (मुले) दि.२५ सप्टेंबर २०२३

- **क्रीडाप्रदर्शन**

- बीपीएड (द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांच्या सहाय्याने दि.१६ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयामध्ये भरवीण्यात आलेल्या आगळ्यावेगळ्या ऑलिंपिक चळवळीसंबंधित क्रीडा प्रदर्शनामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व क्रीडारसिक सहभागी झाले. या क्रीडाप्रदर्शनाचे आयोजन डॉ.योगेश बोडके व डॉ.शरद आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

आंतरमहाविद्यालयीन

अ.क्र	बाब	बीपीएड प्रथमवर्ष		बीपीएड द्वितीयवर्ष		एमपीएड प्रथमवर्ष		एमपीएड द्वितीयवर्ष		एकूण
		मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	
१	आर्चरी			१						१
२	ॲथलेटिक्स	२	४	९	३					१८
३	बॅडमिंटन			२						२
४	बॉल बॅडमिंटन	१		७						८
५	बेसबॉल	५	४	११	५					२५
६	बास्केटबॉल			४		४		२		१०
७	बीसेट फिजिक्स	१								१
८	कॅनोइंग		१							१
९	क्रिकेट	४		७	१	२		१		१५
१०	क्रॉस कंट्री		२		१					३
११	फुटबॉल	६	५	१०	९		१	१	१	३३
१२	ग्रिको रोमन			१		१				२
१३	हॅन्डबॉल	४	३	११	५	१	१		१	२६
१४	हॉकी	२		१५	१	१				१९
१५	ज्युदो			१	१					२
१६	कबड्डी	३		९		३				१५
१७	खो खो	८		९				१		१८
१८	कॉर्फबॉल	१	१	५	२		१	२		१२
१९	मल्लखांब		१							१
२०	लॉन टेनिस			१						१
२१	नेटबॉल				१		१	२		४
२२	पॉवर लिफ्टींग			१						१
२३	रोल बॉल			१						१
२४	सॉफ्टबॉल		१							१
२५	स्विमिंग				१					१
२६	व्हॉली बॉल	३		८						११
२७	वेट लिफ्टींग			१						
२८	फ्री स्टाइल कुस्ती			१		१				२
	एकूण	**४०**	**२२**	**११**	**५**	**३०**	**१३**	**४**	**९**	**२३५**

आंतरविभागीय सहभाग

अ.क्र	बाब	बीपीएड प्रथमवर्ष		बीपीएड द्वितीयवर्ष		एमपीएड प्रथमवर्ष		एमपीएड द्वितीयवर्ष		एकूण
		मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	
१	आर्चरी		२							२
२	ॲथलेटिक्स		३	१	१					५
३	बॅडमिंटन		१							१
४	बॉल बॅडमिंटन		१							१
५	बॉल बॅडमिंटन	२	१		२		1		1	७
६	आर्चरी				१					१
७	ॲथलेटिक्स	१		२	१					६
८	बॅडमिंटन	३		२						५
९	बॉल बॅडमिंटन	१								१
१०	बॉल बॅडमिंटन			४						४
११	आर्चरी			१						१
१२	ॲथलेटिक्स			२						२
१३	बॅडमिंटन			१						१
१४	बॉल बॅडमिंटन			१						१
१५	बॉल बॅडमिंटन			१						१
	एकूण	**७**	**८**	**१५**	**५**	**१**	**२**	**०**	**१**	**३९**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा सहभाग

अ.क्र	बाब	बीपीएड प्रथमवर्ष		बीपीएड द्वितीयवर्ष		एमपीएड प्रथमवर्ष		एमपीएड द्वितीयवर्ष		एकूण
		मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	
१	ॲथलेटिक्स		१							१
२	क्रॉस कंट्री		१							१
३	हँडबॉल	१	१		१					३
४	हॉकी			१	१					२
५	खो खो	२		१						३
६	व्हॉली बॉल	१			१					१
७	ज्युदो			१						१
८	कॅनोइंग		१							१
	एकूण	**७**	**८**	**१५**	**५**	**१**	**२**	**०**	**१**	**३९**

आंतरविद्यापीठीय स्पर्धा वैयक्तिक सहभाग

अ.क्र	नाव	क्रीडाबाब	अभ्यासक्रम	स्पर्धेचे स्थान	कार्यकान
१	अभिषेक पट्टणशेट्टी	ज्युदो	BPEd II	गुरुनानक देव विद्यापीठ, अम्रितसर	सहभाग
२	मंगेश आहीरे	हॉकी	BPEd II	इव्हली प्रोफेशनल विद्यापीठ,पंजाब	सहभाग
३	सौरभ आव्हाणे	खो खो	BPEd II	श्री.रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	सहभाग
				डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड	प्रथम क्रमांक
४	रोहीत भायजे	खो खो	BPEd I	श्री.रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	सहभाग
				डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायग़ाड	प्रथम क्रमांक
५	अतुल भोसले	खो खो	BPEd I	डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड	प्रथम क्रमांक
६	प्रतिक कदम	व्हॉली बॉल	BPEd I	श्री. रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (वेस्ट झोन)	सहभाग
				राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (क्रीडा महोत्सव)	सहभाग
७	मेघाराणी देवकर	बेसबॉल	BPEd II	टी.जी.कॉलेज, बारामती	द्वितीय स्थान
८	मेघाराणी पवार	कॅनोइंग	BPEd I	कटली वॉटर स्पोर्ट, चंढीग़ड	सहभाग
९	तेजश्री निकते	हॅन्डबॉल	BPEd I	उदयपूर, राजस्थान	सहभाग
१०	वृषाली उत्तेकर	ॲथलॅटीक्स	BPEd I	भुवनेश्वर, ओडिसा	सहभाग
११	संजीवनी कोंडूभैरी	हॅन्डबॉल	BPEd II	उदयपूर, राजस्थान	सहभाग
१२	प्रणाली पाटील	हॉकी	BPEd II	पुणे	सहभाग
१३	ब्रह्मा साळुंखे	हॅन्डबॉल	BPEd I	एम.पी. सागर	सहभाग

आंतर महाविद्यालयीन सांघिक यश

अ.क्र	क्रीडाबाब	कामगिरी	
		मुले	मुली
१	हॅन्डबॉल	-	1 Place
२	बेस बॉल	2 Place	-
३	व्हॉली बॉल	2 Place	-
४	खो खो	2 Place	
५	बेस बॉल	-	3 Place
६	हॉकी	3 Place	-

पंच कार्य

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. रोख पारितोषिके मिळवतात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात. डॉ. शिरीष मोरे आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा व पंचकार्य विभाग सांभाळतात.

- एम.पी.एड प्रथम व द्वितीय वर्ष द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पुणे आंतराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये डॉ. कुमार उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवक म्हणून कार्य केले.
- बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि.२१ ते २५ जानेवारी २०२४ रोजी संस्थेने आयोजित केलेल्या अंध मुलांच्या क्रीकेट मॅचेसमध्ये स्वयंसेवक म्हणून उत्तम योगदान दिले.
- पुणे शहर क्रीडा समितीने दि.१६/१०/२०२३ आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धेत बी.पी.एड प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. शिरीष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य केले.
- पुणे शहर क्रीडा समितीने दि. २८/१०/२०२३ आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धेत बी.पी.एड प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. शिरीष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य केले.

आंतरकुल स्पर्धा

हा बीपीएड् व एमपीएड अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम असून यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धाचे आयोजन व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येते. दर शनिवारी आयोजित होणाऱ्या आंतरकुल स्पर्धांमध्ये विद्यार्थी अतिशय हिरीरीने व उत्साहाने सहभागी होतात. यामध्ये मॉडिफाइड रिले, हँडबॉल, व्हॉलीबॉल, रस्सीखेच, मास ॲथलेटिक्स, फुटबॉल, जिम्नॅस्टिक, फुकरे या क्रीडाबाबींचा समावेश होता.

आगाशीयन्स क्रीडा संग्राम –

दि.२१ मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ या कालावधीमध्ये आगाशीयन्स क्रीडा संग्रामचे आयोजन करण्यात आले होते. याक्रिडा संग्रामामध्ये बी.पी.एड प्रथम वर्ष, बी.पी.एड द्वितीय वर्ष व एम.पी.एड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. आगाशीयन्स क्रिडा संग्रामाचे आयोजन एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यानी केले तसेच क्रिडा संग्रामातील स्पर्धांचे पंच कार्य केले. या क्रीडा संग्रामामध्ये ३*३ बास्केटबॉल, फूटसल, हॉकी, डॉजबॉल (मूले), थ्रो बॉल (मूली), सांघिक बॅडमिंटन, सांघिक चेस, सांघिक टेबल टेनिस, ट्रायथलॉन (ॲथलेटिक्स) इत्यादी खेळ खेळण्यात आले. आगाशीयन्स क्रीडा संग्रामाचे उदघाटन मा. श्री. महादेव आबा कासगावडे, जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले आणि समारोप समारंभ मा.श्री.आदित्य बेहेरे यांच्या हस्ते करण्यात आले. अगाशीयन्स क्रीडा संग्राम २०२४ चे विजेते पद सुभाष गट (मुले) व वंदन गट (मुली) यांनी पटकावले.

शैक्षणिक शिबिर –

दि. २१ ते २३ डिसेंबर २०२३ या कालावधीत बीपीएडच्या (द्वितीयवर्ष) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शिबिर स्नेहसेवा, खानापूर येथे आयोजित करण्यात आले.

आयोजन –

महाविद्यालयाने दि.१६ व १७ फेब्रुवारी २०२४ रोजी मॅट टू मांईड या आंतरराष्ट्रीय योग परिषदेचे आयोजन केले. या परिषदेने योगाच्या विविध पैलूंमधील ज्ञान, अनुभव आणि अंतदृष्टी यांची देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम केले . ज्याचे उद्दिष्ट शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे खोल परिणाम जाणून घेण्याचे आहे.एकव्यासाचे कुलपती नागद्र गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रेरणादायी उद्घाटन समारंभाने परिषदेची सुरुवात झाली. यानंतर प्रमुख वक्ते डॉ. आनंद भवनानी यांनी योगाच्या उपचारात्मक पैलूंविषयी, डॉ. मन्मथ घरोटे यांनी मनाची भूमिका आणि डॉ. रणजीत भोगल यांनी मंत्र ध्यानाविषयी सांगितले. डॉ. रेझू महातानी यांनी मुद्रा आणि सरेखन, अभिजता

आय्यंगार आणि सुचेता मॅडम यांनी पतंजल योग दर्शनातील ज्ञान प्रक्रियेबद्दल सांगितले.

तांत्रिक सत्रांमध्ये सुमारे १८ पेपर सादरीकरणे होती आणि सुमारे ५६ शोधनिबंध आणि लेख UGC केअर लिस्टेड जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले. समांतर कार्यशाळांमध्ये पारंपरिक योग पद्धतींपासून विशेष तंत्रे जसे की चेअर योग, उपचारात्मक योग, ध्वनी उपचार सत्र, सहज योग ध्यान, प्रॉप्ससह योग आणि जल नीती इत्यादीचा समावेश होता. सहभागींच्या विविध आवडी आणि गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यशाळेमधून विविध अनुभव देण्यात आले.

परिषदेची सांगता डॉ. ईश्वर बसवराद्दी आणि प्रा. संजीव सोनवणे यांच्याकडून करण्यात आली. या परिषदेत आयुष मंत्रालय, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी, उर्मा फाऊंडेशन आणि पीईएफआयची केंद्रीय योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषद यांनी आमच्यासोबत भागीदारी केली होती.

- ऑल इंडिया आंतर विद्यापीठ (मुली) खोखो स्पर्धेचे दि. १५/०२/२०२४ ते १९/०२/२०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले. या स्पर्धेस १६ संघ व साधारण २४० महिला खेळाडू विद्यार्थिनीं सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे संचालक म्हणून डॉ.शिरीष मोरे यांनी काम केले.

  महाराष्ट्रीय मंडळाचे चद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुण आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो-खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा १५ ते १९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, मुकुंदनगर येथील मैदानावर झाली. या स्पर्धेमध्ये पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण विभाग अशा ४ विभागांतील अव्वल १६ विद्यापीठांचे महिला संघ आणि २४० महिला खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

  या स्पर्धेमध्ये उत्तर झोनमधून लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, रोहतकची महर्षी विद्यानंद युनिव्हर्सिटी, चंदिगढची पंजाब युनिव्हर्सिटी, कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी; दक्षिण झोनमधून युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, कॅलिकट युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ केरळ, भारतीय युनिव्हर्सिटी; पश्चिम झोनमधून पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी, वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटी; पूर्व झोनमधून उत्कल युनिव्हर्सिटी, बुरडवान युनिव्हर्सिटी, हेमचंद यादव विश्वविद्यालय असे १६ संघ सहभागी झाले होते.

  स्पर्धेचे सामने साखळी आणि बाद फेरीमध्ये खेळण्यात आले. सहभागी १६ संघ ४ गटामध्ये विभाग़ण्यात आले होते. साखळी फेरीतील प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरविण्यात आले. स्पर्धेचे सामने सकाळी ७ ते १० आणि संध्याकाळी ५ ते ९ या सत्रांमध्ये खेळवण्यात आले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेले महाराष्ट्रातील प्रियंका इंग़ळे, काजल भोर आणि कोमल दारवटकर आदि नामांकित खेळाडू उपस्थित होते.

  स्पर्धेचे उद्घघाटन १५ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजता प्र-कुलगुरु डॉ.पराग काळकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेतील सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी संघाला आणि उपविजेत्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाला करंडक देण्यात आला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या काजल भोर हिला देण्यात आला. सर्वोत्कृष्ट संरक्षणाचा मान सावितीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीच्या प्रियांका इंगळे आणि सर्वोत्कृष्ट आक्रमकाचा मान डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटीच्या ऋतूजा खरे यांना मिळाला.

✦ प्राध्यापकांसाठी **फॅक्ल्टी** डेव्हलपमेंट प्रोग्रॅम दि. २९ व ३० ऑगस्ट २०२३ रोजी आयोजित करण्यात आला.

- Student centric MOOC दोन दिवसीय कार्यशाळा, तज्ञ श्री. एस. जी. कालेकर दि. २९ व ३० ऑगस्ट २०२३

✦ **क्रीडादिन –** दि.०८/०९/२०२३ रोजी, क्रीडादिनाच्या निमित्ताने, संस्थेच्या शाळांमधील विद्यार्थ्यासाठी शाळेमध्ये मैदानावर फन गेम्स व फन रिले या बाबींचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे विशेष विद्यार्थ्यांसाठी देखील वरील कार्यक्रम घेण्यात आले. बीपीएडच्या विद्यार्थी शिक्षकांनी डॉ. योगेश बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केलेल्या या उपक्रमाची मुख्याध्यापक, शिक्षक पालक व विद्यार्थी यांनी प्रशंसा केली.

✦ **स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन कार्यक्रम –** संस्थेची सर्व शाळा महाविद्यालये एकत्रितपणे साजरे करतो. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची प्रेक्षणीय प्रात्यक्षिके सादर करण्यात येतात. यंदादेखील हे कार्यक्रम अतिशय उत्साहात व दिमाखात संपन्न झाले.

✦ **सेट मार्गदर्शन कार्यशाळा –** महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दि.११ ते १६ मार्च २०२४ या कालावधीत, सेट मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ६५ विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले. डॉ. डी. टी. शेंडकर, डॉ. महेश देशपांडे, डॉ. श्रीकांत महाडिक, डॉ. योगेश बोडके, डॉ.कुमार उपाध्याय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. (डॉ.) पोटे हे या कार्यशाळेचे समन्वयक होते.

✦ **पदव्युत्तर विभाग –**

- दि.२१ जून २००२३ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी ॲक्वा योगा घेण्यात आला.
- दि.१० सप्टेंबर २०२३ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी सायकल ट्रिप आयोजित करण्यात आली.
- जयपूर येथील मनिपाल विद्यापीठ येथे दि.२९ ऑक्टोंबर ते ०४ नोव्हेंबर २०२३ या काळात आयोजित Inter-National Conference on Physical Education & Exercise Sciences (ICPESS2023) मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व शोधनिबंध सादर केले.
- पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये एम.पी.एड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दि ०१/१२/२०२३ ते ०३/१२/२०२३ या कालावधीत पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनच्या कार्यालयीन कामाचे नेतृत्व अनुप डोईफोडे यांनी केले आणि मैदानी कामकाजात मदत केली.
- विविध कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षण आधारीत वर्गात जाऊन शारीरिक शिक्षणाच्या तासिका घेतल्या.
- एम.पी.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी रग्गबी, स्केटिंग, सॉफ्टबॉल, लॉनटेनिस खेळासंबंधीत कार्यशाळा माजी विद्यार्थांमार्फत घेण्यात आल्या.
- दि.११ मार्च २०२४ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी जेरियाटिक सत्राचे आयोजन करण्यात आले.
- दि.१३ मार्च २०२४ रोजी (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांसाठी झुंबा सत्राचे आयोजन करण्यात आले.
- दि.२१ मार्च२०२४ ते २१ मार्च २०२४ या कालावधीत (एम.पी.एड द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांनी आगाशीयन्स क्रीडा संग्रामाचे आयोजन व क्रीडा संग्रामातील खेळांचे पंच कार्य म्हणून काम केले.

✦ **दसरा (शोभायात्रा २४/१०/२०२३) –** महाराष्ट्रीय मंडळाने दि.२४/१०/२०२३ रोजी शतक महोत्सवी वर्षात पदार्पण केले. विजयादशमी तसेच शतक महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्रीय मंडळ टिळक रोड ते आगाशे महाविद्यालयापर्यंत शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेमध्ये संस्थेच्या विविध शाळांनी, महाविद्यालयांनी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या शोभायात्रेमध्ये बास्केटबॉल, मल्लखांब, रोप मल्लखांब, स्केटींग, लाठीकाठी, हॉकी, योगा अशी प्रात्यक्षिके करण्यात आली.

✦ **पालकसभा –** बीपीएडच्या पालकांची सभा दि. ०२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. सभेमध्ये महाविद्यालयाची ओळख, महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच महाविद्यालयाकडून पालकांच्या अपेक्षांविषयी चर्चा झाली. या सभेस स्थानिक पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

✦ **प्राईड ऑफ सीएसीपीई पुरस्कार –** शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांस गेल्या आठ वर्षांपासून, प्राईड ऑफ सीएसीपीई पुरस्कार प्रदान करण्यात येतो. २०२३-२४ चा पुरस्कार महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. श्री सुनिल शिवले यांना जाहीर झाला.

✦ **आंतरराष्ट्रीय योग दिन –** दि २१ जून २०२३ रोजी प्रा.डॉ. उज्ज्वला राजे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योगदिन संपन्न झाला. यामध्ये योगासने, सूर्यनमस्कार व प्राणायाम यांचा समावेश होता.प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बीपीएडचे विद्यार्थी शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले.

✦ **दहीहंडी महोत्सव –** दि.०७ सप्टेंबर २०२३ रोजी डॉ.महेश देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.पी.एड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.

✦ **दीपावली विशेष –** दरवर्षी आम्ही सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून दीपावली आगळ्यावेगळ्या स्वरूपात साजरी करतो 'दिवाळीसाठी देऊया' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील अनाथालयातील मुलांसोबत व वृध्दाश्रमातील वृध्दांसोबत दिवाळी साजरी केली. यंदा दीपावलीच्या निमित्ताने ०८ नोव्हेंबर २०२३ रोजी करमणूकप्रधान खेळांचे आयोजन, उपयुक्त वस्तू आणि फराळ वाटप करण्यात आले.

✦ **छात्रसेवा उपक्रम –** बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी छात्रसेवा (इंटर्नशीप) कार्यक्रम, विद्यार्थ्यांना थेट शाळांमधील व्यवस्थापन व शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येतो. महाराष्ट्रातील शाळांमध्ये, विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गावा, शहरांमधील शाळांमध्ये छात्रसेवा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्यात आला.

✦ **चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळांमधील सहभाग –**

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या Refresher course मध्ये डॉ.योगेश बोडके यांनी मार्गदर्शन केले.
- रायपूर (एम.पी) येथे आयोजित करण्यात आलेल्या Refresher course मध्ये डॉ.योगेश बोडके यांनी मार्गदर्शन केले.
- बी.एम.सी.सी महाविद्यालयात Faculty Devlpment Programme आयोजित करण्यात आला. या कार्यशाळेत डॉ.योगेश बोडके यांनी तेथील प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.
- बालभारती, पुणे यांनी अभ्यासक्रमावर आधारित नव्याने पाठ्यपुस्तक निर्मिती समितीच्या सदस्य निवडीसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत डॉ. श्रध्दा नाईक, डॉ.महेश देशपांडे, डॉ. योगेश बोडके, डॉ. अमित प्रभू आणि डॉ. शिरीष मोरे यांनी सहभाग घेतला.

✦ **कँपस प्लेसमेंट –** विद्यार्थ्यांना उत्तम रोजगारसंधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयाच्या रोजगारकक्षाद्वारे कँपस इंटरव्ह्यू आयोजित केले जातात. नामांकित शाळा, महाविद्यालये, फिटनेस सेंटर्स, जिम व कंपन्यामध्ये आमच्या बीपीएड्. व एम.पी.एड् च्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळतात. वर्षभर विद्यार्थ्यांना नोकरी संदर्भात मार्गदर्शन करण्यात येते. डॉ. उज्ज्वला राजे प्लेसमेंट विभागाच्या समन्वयक आहेत.

✦ **परीक्षा आयोजन –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बीपीएड व एमपीएड्च्या परीक्षा संचालक, डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वांच्या सहकार्याने विहित मुदतीत पूर्ण झाले.

✦ **ग्रंथालय** – ग्रंथालयातर्फे खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१.	ग्रंथालय आपल्या दारी उपक्रम पुस्तकभिशी	३०/१०/२०२३ व ०२/१२/२०२३
२.	प्रश्नमंजुषा	१३/१०/२०२३
३.	ग्रंथालयाची ओळख	दि.१४/१०/२०२३
४.	पुस्तक प्रदर्शन	दि.२८/११/२०२३
५.	बीपीएड व एमपीएडच्या विद्यार्थ्यांसाठी Nlist demonstration	०७/१२/२०२३ व ०२/०३/२०२४
६.	सेट मार्गदर्शन – श्री.महादेव नरावडे	०१/०२/२०२४

या वर्षावधीत एकूण रू. ४७,३७३/– चे संदर्भग्रंथ, पुस्तके, नियतकालिके अशी खरेदी करण्यात आली. ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी ०८ संगणक व वाय–फाय सुविधा उपलब्ध आहे. आजमितीस ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके १२४२९, शीर्षके १०७६८, क्रमिक पुस्तके ४६५, संदर्भ ग्रंथ ४७०८, विश्वकोश ७५, सीडी रॉम्स व व्ही.सी.डी १११ इ. उपलब्ध आहेत.

✦ **क्रीडासाहित्य** – या वर्षावधीत एकूण रू.१,३२,२४०/– ची क्रीडासाहित्य खरेदी करण्यात आली.

✦ **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने** – गुरूपौर्णिमा, प्रेरणादिन, गोपालकाला, मकरसंक्रात हे सांस्कृतिक आणि योगदिन, क्रीडादिन, स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिन हे राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच देशभक्तीपर गीते, महिला दिन, संविधान दिन, गणेशोत्सव, दीपावली सेलिब्रेशन या कार्यक्रमांचा समावेश होता. वर्षभरात आयोजित करण्यात आलेली विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने खालीलप्रमाणे...

अ.क्र.	व्याख्यात्याचे नाव	विषय
	ऑनलाईन व ऑफलाईन व्याख़्याने	
१	यशोमती थेऊकर	इंग्लिश स्पिकींग कोर्स (९ मार्च २०२३)
२	श्री.सुनिल कालेकर	एफडीपी प्रोग्राम (२९ व ३० ऑगस्ट २०२३)
३	श्री.बंटी शेख	व्हॉली बॉल कार्यशाळा (८ ते ११ मे २०२३)
४	श्री.सचिन शिर्के	Teaching & Evaluation (२८ नोव्हेंबर २०२२ ते ३० मार्च २०२३)
५	गौरी सुनंदा	कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविषयी जागृती (दि.१६ मार्च २०२४)
६	अक्षय यादव, दीपाली पाटील, प्रवीण जाधव	Symposium on Reality in School (१९ ऑगस्ट २०२३)
७	यशोमती थेऊकर	इंग्लिश स्पिकींग (१७ जुलै २०२३ ते २२ ऑगस्ट २०२३)
८	काव्या आढाव	गणपती बनवण्याची कार्यशाळा (०९ सप्टेंबर २०२३)
९	ज्योती काजळे	वैदिक गणित (०३ नोव्हेंबर २०२३)
१०	राजेंद्र कदम कुस्ती कार्यशाळा	(०१ नोव्हेंबर २०२३ ते १८ डिसेंबर २०२३)
११	लखन मोरे	बास्केटबॉल कार्यशाळा (०४ नोव्हेंबर २०२३ ते ०८ जानेवारी २०२४)

✦ **निवृत्ती, नियुक्ती, पदोन्नती व धारणाधिकार** – या वर्षावधीमध्ये सेवांतर्गत पदोन्नती योजनेअंतर्गत (CAS) खालील प्राध्यापक पदोन्नतीस पात्र ठरले. सहयोगी प्राध्यापक – डॉ. शिरीष मोरे

महाराष्ट्रीय मंडळाचे खंबीर पाठबळ, प्राध्यापकवृंद आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालय प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

होतात फक्त आधीच तुम्ही हार मानू नका, कारण प्रयत्न करणं आपल्या हातात असतं, आपण ते करत रहायचं. अशी मोलाची शिकवण शिक्षण घेताना आमच्या प्राध्यापकांकडून मिळाली. खेळ ते शारीरिक शिक्षणाचा प्रवास संपायला माझ्याकडे दोन महिने बाकी आहेत. कॉलेजात आता तर काऊंट डाऊन सुरु झाला आहे.

खेळ माणासाला खूप काही शिकवून जातो. हे आता मला खरं वाटायला लागलं आहे. पी.ई. आणि पी.टी. यातील फरकही मला समजला आहे. या प्रवासात आपल्या वागणूकीपासून तर आपले विचार कसे सुशिक्षित हवेत हे शिकलो. डिसिप्लिन, लीडरशीप अशा आयुष्य जगण्यास कामी येणाऱ्या गोष्टीसुद्धा शिकलो. माझ्या स्वप्नातल्या खेळाच्या कॉलेजापेक्षा हे कॉलेज उत्तम ठरले. आता कोणतीही परिस्थिती असो मागे हटायचे नाही. अशी कॉलेजच्या वातावरणाने मोलाची शिकवण दिली.

ह्या कॉलेजात आता आमची वेळ संपत आली आहे. आता ह्या आठवणिंना आठवू तर शकतो पण इथे परत येवू शकत नाही याची खंत कायम मनात राहील.

एक प्रयत्न तु अजुन कर
माडा परी उंच बहर
येजील अनेक अडचणी
तुझ्या वाटेवरती
तु फक्त प्रयत्नतर कर
तु फक्त प्रयत्नतर कर



M.P.Ed. Toppers 2021-2022



OMKAR B. JADHAV
Rank 1st (85.35)



VEDANTI D. PREMCHANDANI
Rank 3rd (85.20)



SHEETAL S. KARPE
Rank 2nd (84.25)

B.P.Ed. Toppers 2021-2022



VAISHAVI S. BARKE
Rank 1st (88.67)



PRADNYA S. WAREKAR
Rank 2nd (86.14)



DHIRAJ B. BAWNE
Rank 3rd (84.78)

Ph.D Awarded



DR. MANOJ DEOLEKAR



DR. SAMEER PAWAR



DR. KUMAR UPADHYAY



DR. EKTA JADHAV



DR. NITIN WALUNJ

All India Inter University Competition



PRATIK KADAM
Vollyball Inter University Participation



SAURABH AVHANE
Kho-Kho Krida Mohotsav 2023
Gold Medal



MEGHARANI DEVKAR
Baseball Inter University Participation



ATUL BHOSLE
Kho-Kho Inter University Participation



SANJEEVANI KONDUBHIRE
Handball Inter University Participation



MANOJ AHIRE
Hockey Inter University Participation




ROHIT BHAIJE
Kho-Kho Inter University Participation



ABHISHEKH PATTANSHETTI
Judo Inter University Participation



MEGHARANI PAWAR
Canyoning Inter University Participation



TEJASHREE NIKTE
Hanball Inter University Participation



VRUSHALI UTTEKAR
Athletics Inter University Participation



PRANALI PATIL
Hockey All India Inter University Participation



BRAHMA SALUNKHE
Handball Inter University Participation



YOGA

Mat To Mind

(Conference & Workshops)





































Sports & Fitness Exhibition

S.P.E.C.T.R.A.

Sports Physical Education Exhibition
Curated for Training Attendees













GANESH FESTIVAL











PARENTS MEETING









NATIONAL SPORTS DAY WITH SPECIAL SCHOOL





















MPEd. INTERNATION CONFERENCE PARTICIPATION, MANIPAL UNIVERSITY, JAIPUR











MPEd. GERIATRIC & DIVYANG SCHOOL VISIT & ACTIVITY

















All India Inter-University
KHO-KHO TOURNAMENT
(Women)























Intramural Competitions




Modified Equipments











AGASHIAN KRIDA SANGRAM 2024





























Camp









Gayatri Pawar
S.Y.BPEd

महाराष्ट्रीय मंडळाचे

चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय